महाराष्ट्र शासन

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दूरध्वनी क्र.:२६१२२८४६/४७
Email:coop.dyrcs.indl२०१८@gmail.com

---

जा.क्र.सआ/सर्वसा.१६/मजूर सह.सं.नोंदणी/परि.मागे/१५७/२०२५ दिनांक : १८ एप्रिल, २०२५

## -: परिपत्रक :-

**विषय:- नियोजित मजूर सहकारी संस्था नोंदणीबाबत...**

संदर्भ:- १)या कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. १६ सआ/मजूर सह.संस्था नोंदणी निकष/३८/२४ दि.२ फेब्रुवारी,२०२४
२)या कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र.१६ सआ/मजूर सह.सं.नोंदणी निकष/२४६/२४ दि.११ जुलै,२०२४

नियोजित मजूर सहकारी संस्था नोंदणीबाबत सहकार आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे या कार्यालयाचे परिपत्रक दि.०२/०२/२०२४ मधील मुददा क्र. ४(१३) अन्वये मजूर सहकारी संस्थांच्या नोंदणीकरीता काही विशिष्ठ तत्वे ठरवून त्या तत्वावर हुकूम नोंदणीकरीता प्रकरणाची छाननी करण्याकरीता व पूर्व परवानगी घेण्याकरीता विभागीय पातळीवर विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती नियुक्त करणेत आलेली आहे.

तथापि अस्तित्वात असलेल्या संस्थांना पुरेशी कामे उपलब्ध नसतांना नविन संस्थाना मान्यता देण्यात येत असलेची बाब निदर्शनास आलेने सदर समितीने यापुढे बैठक घेण्यापूर्वी या कार्यालयाची पुर्व परवानगी घ्यावी. या कार्यालयाचे पूर्व परवानगीशिवाय विभागीय स्तरावर बैठक बोलाविण्यांत येऊ नये तसेच कोणत्याही संस्थेची नोंदणी करण्यांत येऊ नये असे या कार्यालयाकडील संदर्भ क्र.२ दि.११ जुलै, २०२४ चे परिपत्रकान्वये कळविणेत आलेले होते.

आता संदर्भ क्र.२ दि.११/०७/२०२४ रोजीचे परिपत्रक मागे घेण्यात येत आहे. तरी संदर्भ क्र.१ च्या नोंदणी निकष परिपत्रकाप्रमाणे नियो. मजूर सहकारी संस्था नोंदणीबाबत पुढील कार्यवाही करावी.

Tawade

(दिपक तावरे भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना :**

१) विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (सर्व)
३) उप/सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव रवाना**- अध्यक्ष/व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ मर्या,६५५-६५७, लेबर फेडरेशन, बिल्डींग, गुलटेकडी, मार्केटयार्ड,पुणे- ४११ ०३७